## जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
**Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र ८४**

**दिनांक- ०२/०४/२०२१**

# काशिमीरा वाहतूक पोलीसांनी "ग्रीन कॉरीडॉर मोहीम" राबवून ३५ मिनीटांत वोकार्ड हॉस्पीटल मिरारोड ते मुंबई विमानतळ येथे अँबुलन्सने विनाअडथळा पेशंट सुखरुप पोहचविले.

आज वोकार्ड हॉस्पीटल मिरारोड येथून एका गंभीर पेशंटला लिव्हरचे उपचारासाठी पवनहंस विलेपार्ले विमानतळावरुन हैदराबाद येथे पुढील उपचारासाठी पाठवायचे होते. हॉस्पीटल प्रशासन तसेच पेशंटचे नातेवाईक यांनी अँबुलन्सने विनाअडथळा पेशंट सुखरुप पाठविण्यासाठी वाहतूक पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे यांचेशी आज ०२/०४/२०२१ रोजी सकाळी ०७.३५ वाजता फोनव्दारे संपर्क केला. वाहतूक पोलीसांनी सदर अँबुलन्स योग्य त्या बंदोबस्तात पायलट वाहनाचे मदतीने कोठेही ट्राफीक जॅममध्ये अडकणार नाही व ॲम्बुलन्सला पूर्ण रस्ता मोकळा मिळेल याची खबरदारी घेतली. पोलीसांनी ग्रीन कॉरीडॉर मोहीम राबवून ३५ मिनीटांत वोकार्ड हॉस्पीटल ते मुंबई विमानतळ येथे अँबुलन्सने विनाअडथळा पेशंट सुखरुप पोहचविले.

ग्रीन कॉरीडॉर मोहीम, यशस्वी होण्यासाठी मुंबई वाहतूक नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून मिरारोड ते विलेपार्ले यादरम्यान वाहतूक बंदोबस्त लावून घेण्यात आला. त्यांनतर वाहतूक शाखेच्या पायलटींग कार सोबत ०९.१० वाजता ॲम्बुलन्स वोकार्ड हॉस्पिटल मिरारोड येथून निघून ०९.१७ वाजता ॲम्बुलन्सने दहीसर टोलनाका पार केला व पवनहंस विलेपार्ले विमानतळावर ०९.४५ वाजता पेशंटला घेऊन ॲम्बुलन्स सुखरुप पोहचली. वाहतूक पोलीसांनी वोकार्ड हॉस्पिटल, मिरारोड ते विमानतळ केवळ ३५ मिनीटात पेशंटला ॲम्बुलन्सने पोहचवले. पेशंट १०.०५ वा. एअर ॲम्बुलन्सने रवाना होऊन ११.४० वाजता एअर ॲम्बुलन्स हैद्राबादला बागमपेठ विमानतळावर पोहचले. याबाबत नातेवाईकांनी मिराभाईंदर वाहतूक पोलीसांचे आभार मानले आहेत.

सदरची कामगिरी श्री सुर्यकांत गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त (वाहतूक) श्री. रमेश भामे पोलीस निरीक्षक (वाहतूक) तसेच वाहतूक अंमलदार, वाहतूक शाखा मिरा-भाईंदर यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

Scanned with CamScanner